# जिल्हाधिकारी कार्यालयास भारतात प्रथमच आयएसओ मानांकन

## एक- स्वप्न पुर्ती

भारतातील प्रगतीशिल महाराष्ट्र राज्यातील जळगाव हा एक मोठा जिल्हा. जिल्हा स्थापनेच्या शतकपूर्ती वर्षात ह्या जिल्ह्याने प्रतीष्ठा उंचावणारे आएसओ ९००१:२००० हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे मानांकन प्राप्त करुन एक मोठी झेप घेतली आहे. एक स्वप्न पूर्तीचा आनंद जिल्हा प्रशासन घेत आहे.

खर सांगायच तर प्रशासन हे लोकाभिमुखच असले पाहिजे जसे छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या अंमलदारांना शेकडो पत्रे लिहून लोकाभिमुख प्रशासनाचे महत्व आग्रहपूर्वक पटवून दिले. परंतू ईंग्रजी अंमल सुरु झाल्यानंतर सरकारी कामकाज इंग्रजांच्या पोलादी चौकटीतून सुरु झाले. हे प्रशासन ब्रिटीश लोकांशी व त्यावेळच्या संसदेशी प्रामाणीक होते. परंतु स्वातंत्र्यानंतर सरकारी नोकरांचा लोकाभिमूख प्रशासनाचा एक वेगळा चेहरा दिसू लागला. तेव्हापासून महाराष्ट्र शासन लोकाभिमूख प्रशासनाच्या वाटचालीसाठी प्रयत्नशिल आहे.

याचीच परिणीती जळगाव जिल्हा प्रशासनाने विजय सिंघल यांच्या नेतृत्वाखाली अथक प्रयत्न करुन संपूर्ण जिल्हा प्रशासनास आएसओ ९००१:२००० हे मानांकन मिळविण्यात झाली.

इ-गव्हर्नन्स, एक खिडकी योजना, सेतू सुविधा केंद्र या सारख्या प्रशासनीक सुधारणांद्वारे द्वारे जनतेपर्यंत प्रशासन पोहोचविणे हे प्रमुख उद्दीष्ठ समोर ठेवून प्रशासकीय सुधारणा करण्याचा कोणत्याही शासनाचा प्रयत्न असतो. दोन वर्षापूर्वी जिल्हाधिकारी विजय सिंघल यांनी जिल्हाधिकारी पदावर रुजु झाल्यानंतर अथक प्रयत्न करुन जनतेस आवश्यक त्या गुणात्मक सुविधा तत्परतेने पुरविण्यासाठी प्रशासकीय कामकाजात सुधारणा घडवून कामाची गुणवत्ता उंचावली, कामकाजात गुणात्मक पारदर्शकता आणली, कामाचा वेग वाढविला. जिल्हाधिकारी व त्यांच्या चमूने कार्यालयीन कर्मचा-यांना प्रवृत्त करुन मोठ्याप्रमाणात लालफितशाहीतून बाहेर काढले. त्याबरोबरच विजय सिंघल यांनी कार्यालयात आमुलाग्र आंतरबाह्य बदल करुन कार्यालयात आल्हाददायी, आरोग्यपूर्ण वातावरण निर्माण करुन कार्यालयीन कामकाजात टापटीपपणा, वक्तशिरपणा आणून कामकाजाची गती, पारदर्शकता आणि तत्परता वाढविली. यामुळे खरोखरच प्रशासनाचा चेहरा बदलला आहे. यामुळे जिल्हा प्रशासनास सन्मानाचे आएसओ ९००१:२००० हे मानांकन मिळविण्यासाठी खूपच मदत झाली.

प्रशासनात कोणत्याही प्रकारच्या सुधारणा घडवून आणतांना नेहमिच आंतरबाह्य विरोधास सामोरे जावे लागते. कर्मचा-यांचे मतपरिवर्तन करणे ही एक जिकरीची बाब. ती यशस्वी करण्यासाठी कर्मचा-यांना विश्वासात घेवून त्यांना प्रशिक्षण दिले. ठराविक काळानंतर याचा परिणाम कर्मचा-यांचे मत परिवर्तन होण्यात होवून कर्मचा-यांनी स्वतः जबाबदारी स्विकारुन त्यांनी स्वतःस या कार्यात झोकुन घेतले.

जिल्हा प्रशासनाने शिस्तबद्ध रितिने खालील उद्दीष्ठे डोळ्यासमोर ठेवून वाटचाल केली.

१. पारदर्शक आणि जबाबदार प्रशासन
२. सांविधानीक आवश्यकता व सातत्याचे पालन
३. प्रशासनात सतत सुधारणा करणे
४. मानव संसाधन विकास

उत्पादन असो की, सेवा त्याची गुणवत्ता वाढून जागतिक गुणवत्तेचा दर्जा प्राप्त करण्यासाठी प्रत्येक संस्थेची धडपड चालू असते. यासाठी कठोर कसोट्या पार करणे आवश्यक असते. आयएसओ मानांकन फक्त खाजगी कंपन्या किंवा कार्यालयालाच नव्हे तर शासकीय कार्यालयांनासूध्दा घेता येऊ शकते हे जळगाव जिल्हा प्रशासनाने दाखवून दिले आहे.

जनमानसात सरकारी कार्यालयाबाबत लालफितीशाई, सरकारी काम सहा महिने थांब अशीच भावना असते. जनमानसातील ही भावना बदलण्याचा प्रयत्न करणे आवश्यक असते. ही भावना कशी चूकीची आहे हे लोकांना कृतीतून पटवून देण्यासाठी जिल्हाधिकारी विजय सिंघल यांनी विशेष प्रयत्न केले. यासाठी प्रारंभी जिल्हयाला वर्षानुवर्षे भेडसावणाऱ्या पाणी प्रश्नावर मात करण्यासाठी एक पाऊल म्हणून नदीजोड प्रकल्प त्यांनी यशस्वी करुन दाखविला तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला. जिल्हाधिकारी विजय सिंघल यांच्या व्यवहार कुशल नेतृत्वाखाली फक्त जिल्हा नियोजन समितीलाच नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयातील एकूण १७ शाखांच्या विविध विषयांच्या प्रक्रियांना गुणवत्ता, पारदर्शकता, जबाबदार प्रशासन व गतीमान कार्यसंस्कृतीसाठी उत्कृष्ट कार्यसंस्कृतीचा मानदंड ठरणारे आयएसओ ९००१-२००० मानांकन मिळविले.

जिल्हाधिकारी विजय सिंघल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व खातेप्रमुखांनी कार्यालयात येणारे सर्व प्रकरणे वेळीच निकालात निघतील यासाठी कार्यपध्दती निश्चित केली. प्रत्येक कार्याचे प्रक्रीया लेखन केले. सुरवातीस जिल्हाधिकारी कार्यालयातील नस्त्यांचे वर्गीकरण करुन अनावश्यक कागदपत्रे नष्ट करण्यात आली. कार्यालयातील जुने मोडकळीस आलेले फर्निचरची विल्हेवाट लावण्यात आली. अतिरिक्त कपाटे ज्यांना आवश्यकता आहे अशा शाखांना, कार्यालयांना, तलाठी कार्यालयांना वाटप करण्यात आले. ज्यामुळे जवळपास ५० कपाटे रिकामी होवून ३० क्लिंटल रद्दी निर्माण झाली. अनावश्यक कपाटे व रद्दीची विल्हेवाट लावल्याने अतिरिक्त जागा निर्माण होवून हवेशीर आरोग्यपूर्ण कार्यलयीन वातावरण तयार झाले. यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. माणीक गुरसळ व उप जिल्हाधिकारी श्री. मनोहर चौधरी यांनी परिश्रम घेतले.

आयएसओ ९००१-२००० ची गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली खालील आठ व्यवस्थापन तत्वांवर आधारलेली आहे

१. ग्राहकाभिमुखता,
२. नेतृत्व,
३. कर्मचाऱ्यांचा सहभाग,

४. प्रक्रियाभिमुखता,
५. पध्दतशीर व्यवस्थापन करणे,
६. निरंतर सुधारणा,
७. वस्तुस्थितीनुसार निर्णय घेणे,
८. परस्पर संबंध

ही तत्वे आपल्या कार्यालयीन पध्दतीस लागू कशी करता येतील याबाबत विचार सुरु झाला. या तत्वांना अंगिकारतांना कार्यालयातील सहकाऱ्यांचा आत्मविश्वासपूर्ण सहभाग घेऊन कामास सुरुवात केली. ही कामे करतांना संस्थेची कार्यपध्दती नियोजनबध्दरितीने आखली, तिची अंमलबजावणी करायला सुरुवात केली, कामकाजाची कार्यपध्दतीची नियमितपणे वारंवार तपासणी केली आणि त्यात काही दोष, उणिवा आढळल्या तर त्या सुधारण्याकरीता योग्य उपाय बदल शोधून काढून ते अंमलात आणले. कार्यपध्दतीचे हे सतत चालणारे चक्र असते. सर्व प्रक्रियांचे लेखन करुन प्रक्रिया व गुणवत्ता पुस्तिका तयार करण्यात आली.

आयएसओ ९००१-२००० प्रमाणिकरण करणाऱ्या विविध संस्थांपैकी आयएससी प्रा.लि. ऑस्ट्रेलिया या कंपनीची निवड करण्यात आली. या कार्यालयास आयएसओ मानांकन घेण्यासाठी खाजगी सल्लागाराची नेमणूक न करता मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांनी सल्ला देण्याचे मान्य केले. त्यांच्या कार्यालयातील शाखा अभियंता डी.टी. महाजन, लिड ॲसेसर यांनी सल्लागार म्हणून महत्वपूर्ण योगदान दिले. त्यासाठी महाजन यांनी कार्यालयात दोन दिवस प्रशिक्षण घेतले. अंतर्गत लेखा प्रशिक्षण व गुणवत्ता व्यस्थापन बैठक घेतली. प्रत्येक कर्मचाऱ्याचा कार्यभार विचारात घेऊन प्रत्येकाने करावयाचे कार्य निश्चित करण्यात आले. कार्यालयातील टंकलेखन यंत्राचा वापर बंद करुन प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी स्वतः संगणकावर काम करणे बंधनकारक केले. टिपणी, पत्र मसुद्याचा दर्जा उंचावण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. संगणीकृत पत्रव्यवहाराच्या यशस्वी वापराने दैनंदिन कामकाजात गुणवत्तापूर्ण भर घातली. अंतर्गत लॅन, अंतर्गत व्हीडीओ कॉन्फरन्सींग, लेटर मॅानिटरींग सिस्टीम, फाईल मृनिटरींग सिस्टीम चा वापर प्राथम्याने केला ज्यामुळे वेळेची व पैशाची बचत झाली व कार्यालयातील विविध योजनांचे यशस्वी सनियंत्रण करता आले. जिल्ह्याची वेब साईट विकसीत करुन वेबसाईटवर जास्तीतजास्त माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या माहितीचा वापर सहजपणे जनतेस करता येतो. त्याअनुशंगाने कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांना वारंवार प्रशिक्षित करुन अ,ब,क,ड प्रमाणे सर्व अभिलेखाची वर्गवारी करण्यात आली आणि अनावश्यक कागदपत्रे नष्ट केली. वेळेच्या नियोजनास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.

आयएसओ मानांकन हे स्वॉटच्या (SWOT) (सामर्थ्य, कमकुवतपणा, संधी, प्रशिक्षण) विश्लेषणावर अवलंबून आहे. हे प्रमाणपत्र देतांना महत्वाचा निकष म्हणजे स्वतःमधील, स्वतःच्या कार्यपध्दतीचा दोष, उणिवा शोधून त्यावर इलाज शोधून ते दुरुस्त करण्याइतपत आपला उद्योग किंवा आपली संस्था प्रगल्भ झाली आहे किंवा नाही हे तपासले जाते. या सर्व बाबींचे अंतर्गत लेखा परिक्षण करण्यात आले. लेखा परिक्षणात निघालेल्या प्रणालीशी असंगत बाबी दूर करण्यात आल्या.

दिनांक १५ फेब्रुवारी ०७ रोजी व्यवस्थापन समितीची बैठक घेण्यात आली. आयएससी प्रा. लि. या कंपनीने दिनांक २० व २१ फेब्रुवारी २००७ रोजी लेखा परिक्षण केले. त्यानंतर कंपनीने दिनांक २६ मार्च २००७ रोजी जिल्हाधिकारी जळगाव यांचे कार्यालय आएसओ९००१:२००० मानांकन मिळविण्यास पात्र असून या कार्यालयाने या मानांकनासाठी आवश्यक ते निकष पूर्ण केले असल्याने हे मानांकन प्रदान करीत असल्याचे कळविले. या सर्व प्रक्रियेत जिल्हा नियोजन अधिकारी श्री. किशोर पाटील यांनी समन्वयाचे उत्कृष्ट कार्य केले.

जिल्हाधिकारी कार्यालाास आयएसओ ९००१-२००० हा गुणवत्तेचा आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झाला म्हणजे आता आपली कार्यपध्दती निर्दोष झाली, सर्वोत्तम झाली असा आपला दावा नसल्याचे जिल्हाधिकारी विजय सिंघल आणि त्यांच्या विभाग प्रमुखांनी सांगीतले. निर्दोष सातत्यपूर्ण उच्च दर्जाची कार्यपध्दती कायम टिकवून धरण्याच्या दृष्टीने उचललेले हे पहिले एक महत्वाचे पाऊल असल्याचे त्यांनी सांगीतले.

पूर्ण जिल्हाधिकारी कार्यालयास आएसओ ९००१:२००० मिळालेल्या या मानांकनामुळे **जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय हे देशात आयएसओ मानांकीत एकमेव जिल्हाधिकारी** कार्यालय ठरले आहे.

**आएसओ प्रमाणपत्र मिळाल्याबध्दल महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री.विलासरावजी देशमुख यांनी श्री.विजय सिंघल,जिल्हाधिकारी जळगांव व त्यांची टिम यांचे जिल्हाधिकारी कार्यालयाला देशात प्रथमःच आय.एस.ओ मानांकन मिळाल्या बद्दल अभिनंदन केले आहे. तसेच राज्याचे वित्त व नियोजन मंत्री मा.ना.श्री.जयंतराव पाटील, राज्याचे कृषी व जलसंधारण मंत्री मा.ना.श्री.बाळासाहेब थोरात, राज्याचे नगरविकास राज्यमंत्री मा.ना.श्री. राजेशजी टोपे, यांनी एका पत्राव्दारे जिल्हाधिकारी विजय सिंघल यांचे अभिनंदन केले आहे.**

**श्रीमती.निला सत्यनारायण (भाप्रसे), अपर मुख्य सचिव (महसुल), श्री. विजय कुमार अग्रवाल (भाप्रसे), प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई, ,श्री.रत्नाकर गायकवाड (भाप्रसे), महासंचालक,यशदा पुणे यांनी व श्री. द. रा भोसले संचालक अर्थ व सांख्यिकी मुंबई यांनी सुध्दा अभिनंदन केलेले आहे.** हा प्रकल्प राज्यभर लागू करण्याच्या दृष्टीने परिपूर्ण प्रस्तावाची सी.डी.किंवा प्रतही त्यांनी मागीतले आहे. जेणेकरुन प्रत्येक जिल्हयात याचे अनुकरण करता येईल.